# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०४/०८/२०१६.

**१) चाकुचा धाक दाखवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०८/०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील आरोपी हा स्टेट बॅकेत पैसे भरण्यास गेला असता फिर्यादी शाखा प्रमुख यास लोन बाबत विचारले असता कागदपत्र दया नंतर लोन मिळेल असे आरोपीस बोलले असता त्यावरुन शाखेतील महीला कर्मचारी व फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन चाकुने मारण्याची धमकी दिली व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादी विलास पंडीतराव बाभरे वय ५७ वर्ष, रा. शाखा अधिकारी स्टेट बॅक शाखा आयुध निर्माण जवाहरनगर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,५०६,१८६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन मारहान व मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी १९.०० ते १९.३० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीला तु आपल्या नव—याला शिवनी जैल मधुन सोडवुण आणली व माझ्या नव—याला का सोडवुण आणली नाही याकारणावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन पोटावर लाथा मारुन व थापडबुक्यांनी मारपीट केले. असे फिर्यादी सौ. सुमन शाम धुर्वे वय २५ वर्ष, रा. चांदपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाईले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) स्थागुशा भंडारा यांची कारवाई. :—**

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी १३.०० वा. दम्यान यातील आरोपी हे नागपुर रोड जावकर पेट्रोल पंप समोर रोडचे बाजुला कार क्र. सीजी ०६/९६७२ ऊभी असुन संशयीतरित्या इसम बसलेले आहेत अशा गुप्त खबरेवर यातील फिर्यादीने स्टॉपसह जावुन गाडीत धाड मारली असता आरोपी जवळुन १ पांढ—या रंगाची सेन्ट्रोकार, ३२ कागदाच्या पुडयात २ ग्रॅम २६० मि.ली ब्राऊन शुगर, आयबॉल कंपनीचा १ मोबाईल, सॅमसंग, नोकीया, जिओनी कंपनीचे मोबाईल, २ नग सिगारेट पॅकेट, बिडी, माचीस, २ सिलव्हर कागद सर्व एका प्लास्टीक पिशवीत भरुन पाकीटात टाकुण डब्बल सिल करुन एकुण कि. २,१५,६२०/—रू. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि काळे स्था. गु. शा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ८(क)२५,२९(१)एनडीपीएस ॲक्ट भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस व इतर वाहनांवरती १०५ केसेस करण्यात आलेल्या आहे.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.